प्रेसनोट

दि. ५/०६/२०२५

# ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून महावितरण कार्यालय, स्पाईन सिटी उपविभाग २, भोसरी, पुणे येथील सहायक अभियंता व खाजगी इसमावर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | भोसरी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, पुणे |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३९ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री. रामप्रसाद सुखदेव नरवडे, वय ३४ वर्ष, पद-सहायक अभियंता, महावितरण कार्यालय, स्पाईन सिटी उपविभाग-२, भोसरी, पुणे. (वर्ग-२)<br>२) श्री. श्यामलाल असोकन, वय ३४ वर्ष, रा. फ्लॅट नं. ११०५, सिल्वर, बोराटेवाडी, मोशी, पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३५,०००/- (पस्तीस हजार) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | २५,०००/- (पंचवीस हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २५,०००/- (पंचवीस हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | ४/०६/२०२५ |
| सापळा दिनांक | ५/०६/२०२५ |
| ठिकाण | महावितरण कार्यालय, स्पाईन सिटी उपविभाग – २, भोसरी, पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. प्रसाद लोणारे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९९२३४४४९९८) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे शासकिय विद्युत ठेकेदार असून त्यांच्याकडे येणा-या लोकांसाठी महावितरण कंपनीचे लायझनिंग व विज कनेक्शन मंजुरीचे काम करतात. तक्रारदार यांनी दि. ४/०३/२०२५ रोजी महावितरण कार्यालय, भोसरी, पुणे येथे एका ग्राहकाच्या घरगुती वीज कनेक्शन संदर्भात अर्ज केला होता. सदरचा अर्ज लोकसेवक रामप्रसाद नरवडे यांचेकडे कार्यवाहीसाठी आलेला होता. सदर अर्जावर कार्यवाही करुन घरगुती कनेक्शन मंजुर करुन देण्यासाठी लोकसेवक रामप्रसाद नरवडे, सहायक अभियंता यांनी तक्रारदारांकडे ३५,००० रुपयांच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दि. २/०६/२०२५ रोजी तक्रारदाराने ला.प्र.वि. पुणे येथे केली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. ४/०६/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक रामप्रसाद नरवडे यांनी तक्रारदाराकडे त्यांचे वरील नमुद काम करुन देण्यासाठी सुरवातील ३५,००० रुपयांच्या लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती २५,००० रुपयाच्या लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

आज दि. ५/०६/२०२५ रोजीच्या सापळा कारवाईमध्ये, लोकसेवक रामप्रसाद नरवडे यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये हजर असलेला ओळखीचा खाजगी इसम श्याम याचेकडे तक्रारदारास २५,००० रुपयाची लाच रक्कम देण्यास सांगितली. त्यानंतर ती लाच रक्कम तक्रारदार यांचेकडून खाजगी इसम श्यामलाल असोकन यांनी पंचासमक्ष स्विकारली असता, त्या दोघांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध भोसरी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शितल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

५/६/२५

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पोलीस आयुक्त / पोलीस उप अधीक्षक * ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे *

Scanned with CamScanner